# गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती

शासन निर्णय क्र. शिक्षण, क्रीडा व समाजकल्याण विभाग क्र. एससी एच-१४७०/१०७५७२/एस.दि. १४.५.१९७१ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. सदर शिष्यवृत्तीी गणित/भौतिकशास्त्र या विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना दिली जाते.

१ ) योजनेचे नाव : गणित व भौतिकशास्त्र प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती.

२ ) संच संख्या : या योजनेकरिता गणित विषयाकरिता ५० व भौतिक शास्त्र विषयाकरिता ५० संच मंजूर आहेत.

३ ) शिष्यवृत्तीचा दर : पात्र ठरणा-या विद्यार्थ्यांना दरमहा रु. १००/- (शा.नि. ५-२-२००४ नुसार) ही शिष्यवृत्ती दिली जाते.

४ ) पात्रता : इ. १२ वी विज्ञान या परीक्षेत किमान ६०% व गणित, भौतिकशास्त्र या विषयात ६०% पेक्षा अधिक गुण प्राप्त करणा-या व संबंधित विद्यापीठांनी शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती मंजूर केली जाते.

५ ) अर्ज कोठे मिळतो : अर्ज संबंधित विद्यापीठे आपल्या महाविद्यालयांना पाठवितात.

६ ) अर्ज कोणामार्फत कोणाच्या नावे पाठवावयाचा : पात्र ठरणा-या विद्यार्थ्याचे अर्ज महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक असते व विद्यापीठाकडून संबंधित अर्जाची छाननी होऊन विद्यापीठ एकत्र प्रस्ताव मा. शिक्षण संचालक [उच्च शिक्षण]. १७, डॉ. आंबेडकर रोड, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडे पाठवितात.

७) अर्ज स्वीकृतिचा अंतिम दिनांक : विद्यापीठांनी प्राप्त करून घेतलेले अर्ज या संचालनालयाकडे पाठविण्यावर अंतिम तारीख ३० सप्टेंबर असते.

८ ) नवीन मंजुरी/नुतनीकरण : गणित/भौतिकशास्त्र विषयातील विद्यार्थ्यांना संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे स्तरावरून केले जाते.

९ ) शा.नि. ५-२-२००४ नुसार खालील प्रमाणे दरांमध्ये बदल केलेला आहे.

| पुर्वीचे दर | ५-२-२००४ सुधारित दर |
|---|---|
| रु. ४०/- द.म. | रु. १००/- द.म. |